**Publication**: - Lokmat

GOLD'S GYM

**Date: -** 25th March 2009



गोल्ड जिम इंडिया प्रा. लि. च्या वतीने आयोजित शरीरसौष्ठव स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा वरळी येथे नुकताच पार पडला. त्या प्रसंगी ४० ते ५० वयोगटातील प्युअर फिटनेसमधील विजेते शाहू गुरव, गोल्ड जिमचे व्यवस्थापक श्रीनिवास गयने, श्रद्धा, संदेश हुले, महेश खोकराळे, आशिष साखरकर, लतेश कापडिया उपस्थित होते.

(छाया : गजानन घुर्ये)

# भारतीय क्रिकेटसाठी सध्या रोमांचक कालखंड - सचिन

**ऑकलंड, दि. २४ (वृत्तसंस्था)** - गेल्या तीन-चार वर्षांएवढा रोमांचक कालखंड मी माझ्या २० वर्षांच्या कारकीर्दीत पाहिला नव्हता, अशी कबुली भारतीय क्रिकेट संघाच्या यशाचा आनंद लुटत असलेल्या सचिन तेंडुलकरने दिली. कसोटीत ४२ आणि एकदिवसीय क्रिकेटमध्ये ४३ अशी एकूण ८५ आंतरराष्ट्रीय शतके नावावर असलेल्या सचिनने न्यूझीलंडमधील विजय आनंददायक होता, असे सांगितले. तो म्हणाला, 'द्रविड आणि माझ्यासाठी येथे विजयी भारतीय संघाचा हिस्सा होणे सुखदच आहे. आम्ही येथे पूर्वीही आलो होतो, पण विजयी होऊ शकलो नव्हतो. मात्र, उशिरा का होईना, चांगले घडले.' येथील ईडन पार्क मैदानावरील सरावानंतर सचिनने सांगितले, 'भारतीय क्रिकेटसाठी सध्याचा कालखंड खूप चांगला आहे. कसोटीमधील विजय तर विशेषच आहे. गेली काही वर्षे आपण परदेश दौऱ्यात जिंकत आहोत. येथेही जिंकल्याचा आनंद मोठा आहे. प्रत्येक क्षेत्रातील कौशल्यामुळे संघ विजयी ठरत आहे. संघाची प्रत्येक आघाडीवर चांगली कामगिरी होत आहे. भारतीय संघाच्या एका ब्रेकची गरज २००१ मधील झिम्बाब्वे दौऱ्यात भागली होती. त्यानंतर वेस्ट इंडीजमध्ये एक कसोटी जिंकली. इंग्लंडमध्येही यश मिळविले. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलियात सरशी साधली. या दौऱ्यात तर संघाने खूप प्रभाव पाडला आहे. संघास याचीच प्रतीक्षा आहे. त्यात यश मिळविल्याने आम्ही समाधानी आहोत.'